INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# जागतिकीकरणाचा भारतीय समाजजीवनावरील परिणाम

**वर्षा पाटलोबा मुंडे**
**(BA MSW)**

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-97847384/IRJHIS2109017

**प्रस्तावना:**

जागतिकीकरणाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने जागतिक आहे की ती केवळ पाश्चात्त्य विचारप्रणालीचा प्रसार करणारी, जाणीवपूर्वक राबवली जाणारी, जागतिकीकरणाचा आभास निर्माण करणारी प्रक्रिया आहे यावर मतमतांतरे आहेत. तथापि, विज्ञान-तंत्रज्ञानामधील व विशेषत: संदेश, दळणवळण व माहिती-तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे संपूर्ण जग जवळ आले आहे, एवढे मात्र निश्चित. आधुनिक जगात जागतिकीकरणाला सामोरे जाणे अनिवार्य झाले आहे. या जागतिकीकरणाचा निर्णायक आणि मोठा परिणाम भारतीय समाजावर झाला आहे यात शंका नाही. जागतिकीकरणातून अनेक समस्यांची सोडवणूक झाली, तद्वतच अनेक नव्या समस्याही निर्माण झाल्या, तसेच जागतिकीकरणापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या समस्यांना वेगळे परिमाण प्राप्त झाले. संप्रदायवाद, प्रदेशवाद, धर्मनिरपेक्षता व सामाजिक सक्षमीकरण (समाजातील वंचित-उपेक्षितांचे, दुर्बल घटकांचे प्रश्न) या घटकांना जागतिकीकरणाने वेगळे आयाम प्रदान केले. या सर्व सामाजिक घटकांना, समस्यांना ज्या संस्थेला हाताळावे लागते, सामोरे जावे लागते, त्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये प्रवेश करू पाहणाऱ्या उमेदवाराला त्याविषयी जाण असायला हवी हे ओघानेच येते. म्हणूनच या घटकांचा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमातील समावेश अगदी स्वाभाविक ठरतो व या घटकांचा साकल्याने केलेला अभ्यासआवश्यक ठरतो. म्हणूनच सदरील पेपरमध्ये जगतीकीकरणाचा एकंदरीतच समाजावर झालेला परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न

केला आहे.

**उद्देश:**

१.जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि भारतीय समाजजीवन समजून घेणे.

२.जागतिकीकरणाचा भारतीय समाज जिवनावर झालेला परिणाम जाणून घेणे.

**जागतिकीकरण म्हणजे काय ?**

जागतिकीकरण म्हणजे, ज्या प्रक्रियेमध्ये माहिती, मूल्ये, तंत्रज्ञान, वस्तू, सेवा, भांडवल, वित्त व व्यक्ती यांचा राष्ट्रा-राष्ट्रांच्या सीमारेखांच्या बंधनांपासून मुक्त, असा प्रवाह असतो, त्या प्रक्रियेस जागतिकीकरण म्हणता येते. या प्रवाहांच्या माध्यमातून जगातील वेगवेगळ्या भागातील प्रदेश एकमेकांशी संलग्न होतात. या प्रक्रियेचे स्वरूप, व्याप्ती, त्याची कारणे व त्याचे परिणाम यांचा अभ्यास आवश्यक आहे.

**जागतिकीकरणाचे समाजजीवनावरील परिणामः**

जागतिकीकरणाचे परिणाम सकारात्मक व तसेच नकारात्मकसुद्धा आहेत. बाजारपेठांमध्ये व त्यांच्या व्याप्तीमध्ये वाढ, स्पर्धात्मकता व त्यातून गुणवत्तेमध्ये वाढ, मोठय़ा प्रमाणात परकीय भांडवलाची उपलब्धता, रोजगार निर्मिती, अनेक सोयी व सुविधांची निर्मिती यांचा समावेश सकारात्मक परिणामांमध्ये करता येईल. या व्यतिरिक्त मूल्ये, विचार, माहिती व तंत्रज्ञान यावर आधारित अनेक प्रदेशांचे समृद्धीकरण होते. टोकाच्या स्पर्धेतून येणारा यांत्रिकी (Mechanical) दृष्टिकोन व त्यातून हरवत चाललेली मानवी संवेदनशीलता, शहरी-ग्रामीण जीवनातील वाढती दरी, बेरोजगारी, नसर्गिक साधनसंपत्तीचा वेगाने होणारा संहार, पर्यावरणावरील दुष्परिणाम, अस्तित्वात असलेल्या समस्याची (उदा. दहशतवाद) व्याप्ती व परिणामकारकता यामधील वाढ यांचा अंतर्भाव नकारात्मक परिणामांमध्ये होतो.

**जागतिकीकरणाचा भाषा, वेशभूषा आणि साहित्यावरील परिणाम:**

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट केल्या गेलेल्या २२ भाषांपैकी मराठी ही महत्त्वाची भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात मराठी बोलणाऱ्या लोकांची संख्या दहा कोटींवर आहे. इंटरनेटवरील विकिपीडिया या ज्ञानकोशातून मिळणार्या माहितीनुसार मराठी ही जगातली १९ व्या क्रमांकाची भाषा आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भाषांच्या

अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बोलीभाषा तर कायमच्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जागतिकीकरणाच्या वेगवान रेट्यात निर्माण होणार्या संधीचा लाभ घेण्याची जनसमूहांची मानसिकता हाही भाषिक र्हासाला कारणीभूत ठरणारा घटक आहे. भारतातच नव्हे, तर आशियात तसेच आफ्रिकी देशांतही लोकांना असे वाटते की त्यांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी, फ्रेंच किंवा स्पॅनिश भाषेतून शिक्षण दिलं तर मोठेपणी मुलांना व्यवसायाच्या आंतरराष्ट्रीय बाजारात रोजगार मिळेल. जेव्हा एखाद्या समाजाला असं वाटायला लागतं की त्याला उदरनिर्वाहासाठी दुसर्या भाषेत शिक्षण घेणं गरजेचं आहे, तेव्हा तो समाज नवीन भाषिक परिस्थिती स्वीकारायचा निर्णय घेतो.

भारतासारख्या बहुभाषिक प्रदेशात नव्या लाटांचासाहित्यावर प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. जागतिकीकरणामुळे सामाजिक व आर्थिक विषमता वाढत जाते, गरीब राष्ट्रे आणि तेथील जनतेच्या दारिद्र्यातत भर पडत आहे. पर्यावरणाचेही प्रचंड नुकसान होत आहे. त्यासाठी वर्तमान बदलायचे असेल तर जागतिकीकरणाच्या प्रवाहात खंबीरपणे उभे राहून साहित्य समृद्ध करावेच लागेल. दूरदर्शन, विविध वाहिन्यांच्या मालिका, चित्रपटांचे आशय या बाबतीत असे दिसते की, अर्थात टिकणारे लिहिता येत नाही, म्हणून त्यांनी आपली लेखणी थांबवावी असे मुळीच नाही. परंतु साचेबद्ध, एकसुरी, कंटाळवाणे आणि एकच लेखन चार-चार संकेतस्थळांवर टाकण्याची सवय, हे सर्व सोडले पाहिजे. अनुभवविश्व जर बदलायचे असेल तर साहित्याच्या विकासाकडे पाहण्याची नवी दृष्टी हवी. इतर भाषेतील कलाकृती आणि विद्यमान मराठी साहित्य यांची तुलना करता ज्ञानपीठ पुरस्कारात आपण किती मागे आहोत ते लक्षात येतेच आहे.

भारतामध्ये अनेक घटकांवर आधारित वैविध्य आढळते. धर्म, पंथ, संप्रदाय, जाती-जमाती, भाषा, वंश, संस्कृती या घटकांमुळे भारतातील विविध प्रदेशांना वैशिष्ट्यपूर्ण ओळख प्राप्त झाली. यामधून प्रादेशिक अस्मिता व त्यातून प्रदेशवाद निर्माण झाला. अनेक कारणांमुळे (प्रादेशिक आशा-आकांक्षा, अनुत्तरित प्रादेशिक प्रश्न, राष्ट्रीय पक्षांचे दुर्लक्ष व अपयश, त्यातून प्रादेशिक पक्षांची निर्मिती व वाढ इत्यादी) प्रदेशवाद वाढला व त्याचे राजकीयीकरण झाले. प्रादेशिक समस्या व त्यांच्या सोडवणुकीसाठी आवश्यक प्रादेशिक स्वायत्तता भारतीय घटना व राजकीय व्यवस्थेमध्ये (संघराज्यीय व्यवस्था) अंतर्भूत आहेच. पण जेव्हा प्रदेशवाद टोकाचा होतो तेव्हा समस्या निर्माण होतात, फुटीरवादाचे आव्हान उभे राहते.

**सारांश:**

सामाजिक सक्षमीकरण ही व्यापक संकल्पना आहे. व्यक्तीला स्वत:हून प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची ‘क्षमता’ प्रदान करणे म्हणजे सक्षमीकरण होय. भारतीय समाजामध्ये अनेक दुर्बल घटक आहेत. यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती व जमाती, आदिवासी, महिला यांचा समावेश होतो. समाजातील दुर्बल घटकांचे जाणीवपूर्वक सक्षमीकरण करणे म्हणजे सामाजिक सक्षमीकरण होय. शासनाद्वारे यासाठी अनेक योजना राबवल्या जातात. या योजनांचे अध्ययन तसेच दुर्बल घटक दुर्बल राहण्यामागची कारणे व इतर उपाय यांचे अध्ययन आवश्यक आहे.

**संदर्भ सुची :**


१. सोनाळकर शिवम, श्रमसंस्कृती आणि साहित्य, शिवम संशोधन पत्रिका, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर.

२. गायकवाड शरद, प्रा. राम शिंदे, जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. शोभने रवींद्र, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन नागपूर.

४. नेमाडे भालचंद्र, साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, बुकविश्व, पुणे.

५. चित्रे दिलीप पुरुषोत्तम, अगतिकांचे जागतिकीकरण, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.